महाराष्ट्र विधानपरिषद

चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागामधील बायोमेट्रिक मशीन नादुरुस्त असल्याबाबत

(१) ६११ (१८-०३-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये लावण्यात आलेली बायोमेट्रिक मशीन नादुरुस्त असल्याने याचा मोठा परिणाम (एम) पश्चिम कार्यालयांतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारावर होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या (एम) पश्चिम विभागातील कर्मचाऱ्यांनी वारंवार वरिष्ठांकडे तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने कर्मचाऱ्यांनी मोर्चा काढून उक्त प्रकरणी तात्काळ तोडगा काढण्याची मागणी केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (२५-११-२०२०) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांमधील बायोमेट्रिक मशिन्स सुस्थितीत कार्यरत राहतील याची जबाबदारी संबंधित खाते/विभाग प्रमुख यांच्यावर सोपविण्यात आली असून, बायोमेट्रिक हजेरीमुळे कर्मचाऱ्यांचे वेतन रोखण्यात आले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पश्चिम विभागातील विविध खात्यांकरीता एकूण १२८ बायोमेट्रिक मशिन्स बसविण्यात आल्या असून, माहे डिसेंबर, २०१९ ते फेब्रुवारी, २०२० या कालावधी दरम्यान बायोमेट्रिक मशीन बंद असल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद डीएमआयसी प्रकल्पांतर्गत कन्व्हेंशन सेंटरबाबत

(२) ६६२ (१८-०३-२०२०) श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे डीएमआयसी प्रकल्पांतर्गत शेंद्रा एम.आय.डी.सी.मध्ये कन्व्हेंशन सेंटर मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कन्व्हेंशन सेंटरसाठी किती एकर जमीन संपादित केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई (२३-११-२०२०) : (१) होय, अंशत: खरे आहे.

अति. शेंद्रा औद्योगिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक्झिबिशन कन्व्हेंशन सेंटर उभारण्यात येणार होते. तथापि, अति. शेंद्रा औद्योगिक

क्षेत्रासाठी एकूण ८३९ हे.आर संपादित केल्यानंतर ते क्षेत्र डीएमआयसी प्रकल्पांतर्गत स्मार्ट औद्योगिक शहर विकसित करण्यासाठी औरंगाबाद इंडस्ट्रीयल टाऊनशीप लिमिटेड (AITL) या विशेष हेतू कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. AITL ने तयार केलेल्या आराखड्यात एक्झिबिशन कन्व्हेंशन सेंटरसाठी जागा राखीव ठेवण्यात आलेली आहे.

(२) AITL या विशेष हेतू कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या ८३९ हे. आर क्षेत्रापैकी १६.६ एकर क्षेत्र AITL ने तयार केलेल्या आराखड्यात एक्झिबिशन कन्व्हेंशन सेंटरसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

फवारणीत विषबाधा टाळण्यासाठी जनजागृती करण्याबाबत

(३) १५७४ (१८-०३-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४७८०७ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१८ ते २०१९ या काळात किटकनाशक फवारणीमुळे ८५५ शेतकऱ्यांना विषबाधा झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किटकनाशकांच्या वापरासंदर्भात व्यापक जनजागृती करुनही फवारणीतील निष्काळजीपणमुळे विषबाधेच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले असून अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये किटकनाशकांच्या फवारणीमुळे शेतमजुरांना विषबाधा होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन किटकनाशक फवारणीत विषबाधा टाळण्यासाठी व्यापक प्रमाणात प्रचार व प्रसिध्दी करुन जनजागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) अमरावती विभागातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ या पाच जिल्ह्यामध्ये दिनांक १ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च, २०१९ अखेर ११७२, तसेच, दिनांक १ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर ११४६ शेतकरी/शेतमजुर यांना विषबाधा झाली असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

तसेच, विषबाधा टाळण्यासाठी जिल्हा, तालुका तसेच गावपातळीवर खरीप हंगाम सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या गाव सभा घेऊन पीक उत्पादन वाढीबाबत तसेच किटकनाशक फवारणी करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत व संरक्षण किट वापरण्याबाबत उन्नत शेती व समृध्द शेतकरी अभियानाच्या माध्यमातून कृषी विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत शेतकऱ्यांना माहिती देण्यात आलेली आहे. तसेच, दरमहा जिल्हा मासिक चर्चा सत्राच्या माध्यमातून पीक उत्पादन व तंत्राबरोबरच शास्त्रोक्त पीक संरक्षणाचा संदेश स्थानिक वृत्तपत्रे, आकाशवाणी या माध्यमांमार्फत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले आहे. या वर्षापासून कौश्यल्यावर आधारीत कामे करणाऱ्या शेतमजुरांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करुन फवारणी करणाऱ्या मजूरांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच, शेतकरी/शेतमजुर यांना किटकनाशक फवारणी करताना घ्यावयाची काळजी व संरक्षण किट वापरण्याबाबत जनजागृती करुन संरक्षण किट देखील वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच, किटकनाशक कंपन्यांना नोडल कंपनी म्हणून नेमणूक करुन जिल्हाधिकारी, आरोग्य विभाग व कृषी विभाग यांच्या समन्वयाने जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत. कृषी विभाग व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त मोहिमेमुळे शेतकरी/शेतमजुर यांना विषबाधा होऊ नये यासाठी कार्य करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

देशासाठी शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबातील मुलांना मोफत शिक्षण देणेबाबत

(४) २४९१ (१८-०३-२०२०) श्री.किशोर दराडे : सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील देशासाठी शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबातील मुलांना सर्व शिक्षण मोफत देण्यासाठी शासनाकडे मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देशासाठी शहीद झालेल्या जवानाच्या घरातील मुलांना सर्व शिक्षण मोफत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दादाजी भुसे (१७-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२) शहीद सैनिकांच्या पाल्यांना केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे मोफत शिक्षणासाठी व्यवस्था करण्यात आली आहे :-

१. शैक्षणिक शुल्काची पूर्ण प्रतिपूर्ती यामध्ये शाळेमध्ये जाणे-येणेसाठी स्कूल बसचे भाडे, रेल्वे, बस पासची मोफत सुविधा देण्यात येते.
२. निवासी शाळेमध्ये वसतिगृह शुल्काची पूर्ण प्रतिपूर्ती.
३. शाळेसाठी पुस्तकांच्या खरेदीसाठी प्रति वर्ष रुपये १०००/- प्रतिपूर्ती.
४. शाळेच्या गणवेशासाठी पाल्यांना प्रथम वर्षासाठी रुपये १७००/- आणि पुढील वर्षासाठी रुपये ७००/- खर्च प्रतिपूर्ती.
५. पाल्यांना कपड्यासाठी प्रथम वर्षासाठी रुपये ५००/- आणि पुढील वर्षासाठी रुपये ३००/- खर्च प्रतिपूर्ती.
६. पाल्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी रुपये २५०००/- आणि व्यवसायिक शिक्षणासाठी रुपये ५०,०००/- पर्यंत शैक्षणिक शिष्यवृत्ती.
७. युध्द विधवांना उच्च शिक्षणासाठी खाली नमूद नुसार खर्च प्रतिपुर्ती.
   अ) पदवी - रुपये २०,०००/- वार्षिक
   ब) पदव्युत्तर शिक्षण - रुपये २५,०००/- वार्षिक
   क) व्यावसायिक शिक्षण- रुपये ५०,०००/- (जास्तीत जास्त)

ड) पाल्यांना आणि युध्द विधवांना एक वेळ संगणक
अनुदान - रुपये ३५,०००/-

उपरोक्त व्यतिरीक्त सर्व पाल्यांना राज्यातील या विभागाच्या अधिपत्याखालील असलेल्या सर्व वसतिगृहात मोफत जेवण व राहण्याची व्यवस्था उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वैजापूर (औरंगाबाद) येथील रामकृष्ण उपसा सिंचनला विद्युत पुरवठा करण्याबाबत

(५) २९२३ (२९-०५-२०२०) श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना सन १९९४-१९९५ मध्ये कार्यान्वित होऊन दोन वर्षांनी बंद पडली असून तत्कालीन शासनाने आर्थिक मदत करून हा प्रकल्प सुरु करण्यासाठी नवीन यंत्र सामुग्री खरेदी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज जोडणी आवश्यक असल्याने वीज जोडणीकरीता महावितरणकडे रुपये २७ लाख जमा केले परंतु महावितरणकडून जोडणी देण्यास विलंब होत असल्याने प्रकल्प कार्यान्वित करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प सुरु झाल्यास वैजापूर व गंगापूर तालुक्यातील सिंचन क्षेत्रात वाढ होऊन किमान ५० गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपसा सिंचन योजनेस तात्काळ वीज जोडणी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (०९-११-२०२०) : (१) होय.
(२) महावितरण कार्यालयाकडून वीज जोडणी देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) होय.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

सार्वजनिक ठिकाणी निर्जंतुकीकरण फवारणी करण्याबाबत

(६) ३२२६ (२९-०५-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस, होमगार्ड, नर्स व डॉक्टर्स सातत्याने सार्वजनिक ठिकाणी फिरत असल्याने त्यांच्या शरीरावर कोरोनाचे विषाणू असण्याचा संभव असल्याने काही ठिकाणी निर्जंतुकीकरणाचा फवारा शरीरावर फवारण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शरीराच्या बाह्य भागावर अशा प्रकारे अशास्त्रीय रसायनाचा फवारा मारून कोरोना विषाणू नष्ट होत नाहीत हे भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या फवारणीमुळे अनेक पोलिसांना तसेच आपत्कालीन कर्मचाऱ्यांना डायरियासारखे विकार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा फवारण्या शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२५-११-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

कोरोना उद्रेकाच्या सुरूवातीच्या काळात काही ठिकाणी सॅनिटेशन डोम/टनेलचा वापर या प्रकारे निर्जंतुक फवारा शरीरावर मारण्याकरता होत होता.

(२) होय, हे खरे आहे.
(३) निर्जंतुकीकरणासाठी केलेल्या फवारणीमुळे त्रास झाल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) दिनांक १९/०४/२०२० च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कोणत्याही व्यक्तीच्या अंगावर निर्जंतुकीकरणासाठी रसायनांचा फवारा मारणे, अशास्त्रीय असल्याने, ही पध्दत वापरू नये, याबाबत सर्व संबंधितांना सूचना संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांच्यास्तरावरून सर्व संबंधितांना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा जिल्हा पाणंद रस्त्यांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(७) ३६२० (०३-०६-२०२०) श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पाणंद रस्ते योजना सुरु करण्यात आल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वर्धा जिल्हा नियोजन समितीतील तत्कालीन पालकमंत्री यांची मंजूरी घेऊन जिल्हा प्रशासनाने निधीसाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला, परंतु त्यानंतर आचारसंहिता आणि सरकार बदलमुळे जिल्ह्यातील २ हजार ३१५ पाणंद रस्त्याचा प्रस्ताव शासनाकडे कार्यवाहीविना पडून आहेत, परिणामी पाणंद रस्त्यांच्या कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शेतकऱ्यांना पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण काढून कच्चे रस्ते तयार करणे, कच्चा पाणंद रस्ता मजबूत करणे, कच्चा व पक्का रस्ता एकत्रित करणे असे या योजनेचे स्वरूप होते तसेच पाणंद रस्त्यांची मोहिम राबविण्यासाठी विविध शासकीय यंत्रणामध्ये सुसूत्रता व जबाबदारीची स्पष्टता रहावी यासाठी राज्यस्तरीय, तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व गावस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती या योजनेंतर्गत भाग 'ब' व 'क' साठी जनसुविधाचे अनुदान, नागरी सुविधाचे अनुदान, खाजगी निधी, महसूली अनुदान, जिल्हा परिषद व पंचायत समितीचा सेस, ग्रामपंचायतीचे स्वत:चे

उत्पन्न, पेसा अंतर्गत उपलब्ध होणारा निधी, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती, नाविन्यपूर्ण योजना, अन्य योजना, मनरेगाच्या निधीचा रस्त्यासाठी वापर करण्यात येणार होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्धा जिल्हा प्रशासनाने रुपये ३० कोटींच्या पाणंद रस्त्यांच्या कामासाठी प्रस्तावास शासनाकडे मंजूरीसाठी पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणंद रस्त्यांच्या कामासाठी निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संदीपानराव भुमरे (२६-११-२०२०) : (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) शेत पाणंद रस्त्यांसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालशेत-निवोशी भोसलेवाडी (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील विहिरीचे प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत

(८) ३६२२ (०२-०६-२०२०) श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालशेत-निवोशी भोसलेवाडी (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील विहिरीच्या दुरूस्तीचे काम जलयुक्त शिवार योजनेतून ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, गुहागरमार्फत सुरू करण्यात आले असून त्याबाबतची वर्कऑर्डर दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी ठेकेदाराला दिल्यानंतर सुमारे १ वर्ष १० महिन्यांचा कालावधी होवूनही ठेकेदारांने तांत्रिक कारणास्तव काम पूर्ण केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामपंचायत, पाणीपुरवठा समिती आणि ग्रामस्थांनी उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, गुहागर, तहसिलदार, गुहागर, जिल्हाधिकारी, रत्नागिरी आदींकडे लेखी निवेदनाव्दारे लक्ष वेधले असता त्याकडे दुर्लक्ष व दिरंगाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालशेत-निवोशी गावाला पाण्याची तीव्र टंचाई भासत असून विहिरीच्या दुरूस्तीच्या कामास नाहक विलंब झाल्याने शिवराज्य शेतकरी संघटनेच्या मदतीने पालशेत-निवोशी भोसलेवाडीतील ग्रामस्थांनी पंचायत समितीच्या मासिक सभेच्या दिवशी पंचायत समिती कार्यालयासमोर दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास उपोषण केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित असलेले विहिरीचे काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करुन विहिरीच्या दुरुस्तीच्या कामास दिरंगाई करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शंकरराव गडाख (१०-११-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मौजे पालशेत भोसलेवाडी येथे विहिर बांधणे या कामास दिनांक १४/०३/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदर कामाची (पावसाळा वगळून) एक वर्षाची मुदत दिनांक ३०/११/२०१९ रोजी संपली होती. परंतु मक्तेदाराचे कुटुंब अपघातग्रस्त झाल्याने मक्तेदार काम करू शकला नाही. तसेच विहिरीला खोदाई करताना कातळ लागल्याने व पाण्याचे झरे त्या कातळामध्ये असल्याने विहिरीचे पाणी कमी होईल या भितीने ग्रामस्थांनी विहिरीचे बांधकाम खालून न करता मधल्या भागातूनच (कातळाच्या वरून) करण्याची मागणी केल्यामुळे कामाबाबत निर्णय घेण्यास विलंब झाला होता. परंतु मक्तेदाराने मुदतवाढीची मागणी केल्यानुसार त्यांना पुढील ३ महिने दिनांक २९/२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली व त्या मुदतीत मक्तेदाराने काम पूर्ण केले आहे. सदर काम पूर्ण झाल्याबाबत पालशेत निवोशी भोसलेवाडी येथील ग्रामस्थांनी व सरपंच, ग्रामपंचायत पालशेत यांनी लेखी पत्राव्दारे कळविले आहे.

सदर कामास विलंब झाल्याबद्दल मक्तेदारास निविदा रक्कमेच्या एक टक्के रक्कम एवढा दंड करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय कर्मचारी, पोलीस व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्याबाबत

(९) ३८७९ (०९-०९-२०२०) श्री.कपिल पाटील : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचारी, पोलीस व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व नागपूर येथील शिक्षकांचे वेतन युनियन बँकेमार्फत वेळेत होत असून तशीच योजना इतरांना लागू करण्याबाबत शासनाचा काय विचार आहे,

(३) असल्यास, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी न होण्यामागची आणि विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (२६-११-२०२०) : (१) होय, खरे आहे.

(२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५, दिनांक १३ मार्च, २०२० च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ एप्रिल, २०२० नंतर आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन खाते केवळ करार केलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच कोषागारांनी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन खाते असल्याखेरीज माहे एप्रिल, २०२० चे वेतन देयके पारित करु नयेत अशा सूचना सदर शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या होत्या. त्याप्रमाणे कोषागारांनी राष्ट्रीयकृत बँकेत कार्यालयाचे वेतन खाते असल्याची खातरजमा करुनच माहे एप्रिल, २०२० ची वेतन देयके पारित केली होती.

अपवादात्मक परिस्थितीत जेथे राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखा नाहीत अशा तालुक्यात राष्ट्रीयकृत बँकांशी संलग्न प्रादेशिक ग्रामीण बँकांमार्फत शासकीय व्यवहार पार पाडले जात आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्यातील मृत कोरोनाग्रस्त रुग्णांची संख्या लपविण्यात आल्याबाबत

(१०) ४०४२ (१७-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक आरोग्य संघटना, आयसीएमआर तसेच नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल यांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कोविडबाधित मृत्यू प्रकरणाची कारवाई करणे बंधनकारक असताना, राज्य शासनाने यासाठी स्वतंत्र डेथ ऑडिट समिती स्थापन करून वेगळीच मार्गदर्शन तत्वे तयार करून, त्याव्दारे या समितीने सुमारे ९५० कोविडचे मृत्यू हे विनाकोविड दाखवून गुन्हा केलेला असल्याने या गंभीर धोकादायक जीवघेणा प्रकाराबाबत चौकशी करून मुंबई तसेच राज्यात मृत कोरोनाग्रस्त रुग्णांची माहिती लपविल्याबाबत संबंधित दोषींविरोधात कारवाई करण्याच्या मागणीचे एक पत्र मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ जून, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांनी मृत कोरोनाग्रस्त रुग्णांची संख्या लपविण्यात आल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर शासनाने दिनांक १६ जून, २०२० रोजी जाहीर केलेल्या नवीन आकडेवारीनुसार मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अधिकचे ८६२ मृत्यू तर राज्यात ४६६ मृत्यू असे एकूण १३२८ अधिकचे मृत्यू आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२८-१०-२०२०) : (१) मा.विरोधी पक्षनेता यांनी दिनांक १५/०६/२०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांना पत्र लिहिलेले आहे, हे खरे आहे.

परंतु, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोविड-१९ आजार येण्यापुर्वीपासून सांसर्गिक आजारामुळे होणाऱ्या मृत्यूचे विश्लेषण मृत्यू अन्वेषण समितीमार्फत करण्यात येते. कोविड-१९ साठी स्थापन केलेल्या डेथ ऑडीट कमिटी समितीने जागतिक आरोग्य संघटना आणि आय.सी.एम.आर. यांनी दिलेले निकष विचारात घेवूनच मृत्यूचे विश्लेषण करण्यात येत आहे. यासाठी राज्य शासनाकडून वेगळी मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

(२) राज्यातील कोविड-१९ पॉझिटिव्ह व्यक्ती आणि कोविड-१९ मुळे होणारे मृत्यू याचा नियमितपणे ताळमेळ करण्यात येतो व त्यामध्ये रुग्ण संख्या व मृत्यांची संख्या यात फरक आढल्यास, तो पोर्टलवर दुरुस्त करण्यात येतो. यासाठी सर्व जिल्ह्यांना नियमितपणे कळविण्यात येते. त्यानुसार दिनांक १६/०६/२०२० चा दैनंदिन अहवालामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचे ८६२ व उर्वरित राज्यातील ४६६ असे एकूण १३२८ मृत्यूची नोंद घेण्यात आली.

(३) मृत्यू अहवालानंतर खातरजमा करून पोर्टलवर नोंदविणे हा प्रक्रियेचा भाग आहे व सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कोरोना संकटाच्यावेळी सहकार्य करणाऱ्या संस्थांचा गौरव व सन्मान करण्याबाबत

(११) ४१०५ (१७-०७-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मार्च-एप्रिल, २०२० मध्ये कोरोना विषाणूच्या संसर्गाचा सामना करण्यासाठी सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था व समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींचे मोलाचे सहकार्य झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोरोनासारख्या महामारीच्या संकटावेळी सहकार्य केलेल्या सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था व संस्थेतील प्रतिष्ठित व्यक्तींचा गौरव व सन्मान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२८-१०-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) याबाबत शासनास प्रस्ताव प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रिजनल जेरियाट्रीक सेंटर सुरू करण्याबाबत

(१२) ४१२५ (१७-०७-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्यावतीने वृध्दांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे ३० खाटांचे रिजनल जेरियाट्रीक सेंटर सुरू होणार होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सेंटरसाठी राज्यातुन केवळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांची निवड करण्यात आली असून यासाठी केंद्र शासनाकडून ६० टक्के व राज्य शासनाकडून ४० टक्के निधी मिळणार होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रिजनल जेरियाट्रीक सेंटर सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (२८-१०-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सदर योजना केंद्र राज्य हिस्सा निधी ६०:४० या प्रमाणात आहे.

(३) याविषयी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे केंद्र शासनाच्या योजनेतंर्गत "रिजनल जेरियाट्रीक सेंटर" उभारण्यास राज्य शासनाने मान्यता देण्यात आलेली असून याबाबतचा सामंजस्य करार केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. याबाबत केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर केंद्र सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही

राज्यात जात पडताळणी प्रमाणपत्र प्रक्रियेत सुलभता आणण्याबाबत

(१३) ४१६३ (१४-०९-२०२०) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४४६ ला दिनांक २ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी सन २०१९ मध्ये निवृत्त न्या.पी.व्ही. हरदास यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास दिनांक २९ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाचा अभ्यास करुन अहवालातील शिफारशींसंदर्भात कायदेशीर बाबी तपासून त्याबाबत अभिप्राय देण्याबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे अभिप्रायार्थ पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित असल्याने विधी व न्याय विभागाकडून याबाबतचा अभिप्राय शासनास प्राप्त झाला आहे काय, विधी व न्याय विभागाने सादर केलेल्या अभिप्रायाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, राज्यात जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या प्रक्रियेत सुलभता आणण्याबाबत अहवालात करण्यात आलेल्या कोणत्या शिफारसी स्वीकारल्या आहेत तसेच त्याची अंमलबजावणीकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०५-११-२०२०) : (१) होय.
(२), (३) व (४) विधी व न्याय विभागाने सदर अहवालातील कायदेविषयक शिफारशींच्या अनुषंगाने त्यांचे अभिप्राय विभागास उपलब्ध करुन दिले असून अहवालातील प्रशासकीय बाबींसंदर्भातील शिफारशींच्या अनुषंगाने विभागाने निर्णय घ्यावा असे मत व्यक्त केले आहे. त्यानुसार विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायाचा समावेश करुन निवृत्त न्या.पी.व्ही. हरदास यांच्या समितीचा अहवाल शासनाच्या विचारार्थ सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहर व उपनगरासह इतर जिल्हयामध्ये मच्छिमारांना घरांच्या जागा व मासळी सुकविण्याच्या जागेचे मालकी हक्क देण्याबाबत

(१४) ४१८७ (१४-०९-२०२०) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७४५ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात
सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरासह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील मच्छिमारांच्या घरांच्या जागा व मासळी सुकवण्याच्या जागांचे मालकी हक्क मिळावे, अशी मागणी राज्यातील मच्छिमार समाजाने मा.महसूल मंत्री महोदयांकडे माहे जून, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जागांच्या प्रॉपर्टी कार्ड उताऱ्यावर मच्छिमार बांधवांची नावे दाखल होण्यासाठी सर्वेक्षणाची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या पूर्ततेसाठी या जमिनीची मोजणी प्रत्यक्ष मच्छिमार वस्तीत जावून करण्याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छिमारांना घरांच्या जागा व मासळी सुकविण्याच्या जागेचे मालकी हक्क देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (१२-११-२०२०) : (१) मुंबई शहर व उपनगरासह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील मच्छिमारांच्या घरांच्या जागा व मासळी सुकवण्याच्या जागांचे मालकी हक्क मिळण्याबाबतची मागणी राज्यातील मच्छिमार समाजाने महसूल मंत्री महोदयांकडे माहे जून, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यासुमारास देण्यात आलेल्या निवेदनाचा शोध मा.मंत्री (महसूल) यांच्या कार्यालयात घेतला असता, अद्याप सदर निवेदन प्राप्त झाले नाही.
(२), (३) व (४) राज्यातील सागरी किनारपट्टीवरील मच्छिमार गावांमधील जमिनी सरसकट कोळी बांधवांच्या नावावर करण्याबाबत शासनस्तरावरून आदेश देण्यात आलेले नाहीत. तथापि, शासन परिपत्रक क्र.एलएनडी १०८१/सी १७२/सीआर/२४१५/म-६, दिनांक ०४/०२/१९८३ अन्वये मच्छिमारांच्या धंदयासाठी, म्हणजेच जाळी सुकविणे/विणणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे/ दुरुस्त करणे या करीता मच्छिमारांच्या गावालगत/वसाहती लगतच्या सोयीस्कर खुल्या जागा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम २२ खालील तरतुदींनुसार अभिहस्तांकित करण्याच्या सूचना शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. मच्छामार बांधवाकडून समुद्रकिनाऱ्यालगतच्या जागा मासे सुकविणे, जाळी सुकविणे, जाळी विणणे, होडी दुरुस्ती करणे, बोटी शाकारणे इ. करीता राखीव ठेवणेबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना निवेदने प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून दिनांक ०४/०२/१९८३ च्या शासन परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नवीन औद्योगिक धोरणाचे अंमलबजावणी पध्दती व मार्गदर्शक सूचनांचे शासन निर्णय निर्गमित करणेबाबत

(१५) ४३६७ (१४-०९-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या उद्योग विभागाने दिनांक ७ मार्च २०१९ रोजी पुढील पाच वर्षासाठीचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक धोरण हे फक्त ५ वर्षासाठी असते आणि ते जाहीर होऊन १ वर्ष व तीन महिने होऊन देखील त्यामधील नवीन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी उद्योग विभागाकडून अंमलबजावणी पध्दती व मार्गदर्शक सूचनांचे शासन निर्णय निर्गमित झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक धोरण जाहीर होऊन देखील मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णय निर्गमित न झाल्यामुळे उद्योजकांना त्यांचा फायदा घेता येत नाही व त्यामुळे राज्याच्या औद्योगिक विकासावर परिणाम होतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, औद्योगिक धोरणाची अंमलबजावणी पध्दती व मार्गदर्शक सूचनांचे शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई (२४-११-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्याचे औद्योगिक धोरण-२०१९ हे दिनांक ०७ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले आहे. सदर धोरणातील योजनांची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित केले आहेत.

१) राज्यातील औद्योगिकदृष्ट्या अविकसित क्षेत्रातील छोट्या समूहांचा, समूह विकास होऊन त्याव्दारे सुक्ष्म व लघु घटकांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळण्यासाठी राज्य शासनाने "महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (एमएसआयसीडीपी) जाहीर केली आहे.

सदर योजनेतर्गत "ड व ड+" क्षेत्रातील रुपये ५ कोटी पर्यंतच्या खर्चाच्या प्रकल्पांना मंजूरी देण्यात येत होती. महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ मधील तरतुदीनुसार "क" क्षेत्राचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. तसेच प्रकल्पाच्या खर्चाची रुपये ५ कोटीची मर्यादा रुपये १० कोटीपर्यंत वाढविण्यात आली असून, त्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २४/०७/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

२) राज्यातील युवक-युवतींना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनविण्यासाठी, त्यांचे स्वयंरोजगार प्रकल्प राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्यातून, सुलभतेने उद्योग घटक स्थापित होऊन पुढील पाच वर्षात सुमारे १ लाख सूक्ष्म, लघु उपक्रम स्थापित होणे व त्या माध्यमातून एकूण १० लाख रोजगार संधी राज्यात उपलब्ध होणे इत्यादीकरीता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत जिल्हास्तरीय छाननी व समन्वय उपसमिती आणि राज्यस्तरीय सनियंत्रण समितीमध्ये औद्योगिक संघटनांचे नामनिर्देशन करण्याबाबत शासन निर्णय, दिनांक ३१/०८/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

३) राजकीय परकीय व देशांतर्गत गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दिनांक २३/०८/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली जागतिक गुंतवणूक प्रोत्साहन परिषद स्थापन करण्यात आली.

४) राज्यात नवीन उद्योग स्थापन व्हावेत विशेषत: अविकसित भागामध्ये उद्योग स्थापन होवून गुंतवणूक आकर्षित व्हावी, राज्यामध्ये उद्योगधंदयांचा प्रादेशिकरित्या संतुलित सर्वसमावेशक विकास साध्य करणे यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे. धोरणात घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी

करण्याच्या अनुषंगाने उद्योग विभागाने क्र.PSI-२०१९/CR-४६/IND-८, दिनांक १६/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१९ घोषित करण्यात आली असून, उद्योजक त्या योजनेंतर्गत प्रोत्साहनांचा लाभ घेत आहेत.

५) देशाच्या एकूण निर्यातीमध्ये राज्याचा वाटा वाढविण्यासाठी राज्यातील लघु व मध्यम उद्योगांना आंतराष्ट्रीय व्यापारामध्ये सहाय्य तसेच राज्यातील संभाव्य निर्यात क्षमता असलेल्या विविध क्षेत्रामधून निर्यातवृध्दी होण्यासाठी आणि निर्यातदारांमध्ये जागरुकता आणून त्यांना स्पर्धात्मक बनविण्यासाठी तसेच राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने तसेच उद्योजकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी राज्यात "राज्य निर्यात प्रचालन परिषद व जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची" स्थापना करण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक १९/१०/२०२० निर्गमित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ मधील योजनाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. धोरणातील काही मुद्ये हे शासनाच्या इतर विभागाशी/क्षेत्रिय कार्यालयाशी संबंधित असून, सदर मुद्यांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विकास आयुक्त (उद्योग) व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात लघु व मध्यम उद्योग बंद असल्याबाबत

(१६) ४३६८ (१४-०९-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ६१९ ला दिनांक २ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या अनेक वर्षात सुमारे ४५ हजार लघु व मध्यम उद्योग बंद पडले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंद पडलेल्या उद्योगांमुळे राज्यात २२ लाख पेक्षा जास्त कामगार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार राज्यातील गुंतवणूक उद्योग आणि रोजगार वाढावा याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई (२०-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

चौथ्या औद्योगिक प्रगणनेच्या अहवालानुसार माहे मार्च, २००७ अखेर राज्यात बंद असलेल्या उद्योगांची संख्या ३७७६३ इतकी आहे. त्यानंतर औद्योगिक प्रगणना झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

राज्यातील बंद पडलेल्या उद्योगांमध्ये सुमारे १,३८,४३३ इतके कामगार बेरोजगार झालेले आहेत.

(३) व (४) बंद उद्योगांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी उपाययोजना करण्यात येतात. महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद असलेल्या उपक्रमांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध होऊन, बंद उद्योग पुन्हा सुरु होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय, दिनांक २ मे, २०१३ अन्वये विशेष अभय योजना जाहीर केली होती. सदर योजनेंतर्गत जे उद्योग घटक विहित कार्यपध्दतीत योग्य ते निकष पूर्ण करतील अशा उद्योग घटकांना विशेष अभय योजनेव्दारे सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर योजनेमध्ये पात्र ठरणाऱ्या घटकाने राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एक रकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ करण्याची तरतूद आहे. सदर योजनेस शासन निर्णय, दिनांक ६ मे, २०१६ अन्वये दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

रोजगार निर्मितीस चालना देण्यासाठी व उद्योगांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी राज्यात सामुहिक प्रोत्साहन योजना सन १९६४ पासून सुरु करण्यात आली. या योजनेत वेळोवेळी बदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत. सामुहिक प्रोत्साहन योजनेचा समावेश राज्याचे नवीन औद्योगिक धोरण २०१९ मध्ये देखील करण्यात आला आहे.

प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत जिल्ह्यातील तालुक्यांची त्यांच्या औद्योगिक विकासाच्या प्रतवारीप्रमाणे अ,ब,क,ड,ड+ आणि विना उद्योग जिल्हा व नक्षलग्रस्त क्षेत्र अशा सात गटात विभागणी करण्यात आली आहे. राज्यातील सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना योजनेतील तालुका वर्गवारीनुसार विहित मर्यादेपर्यंत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, व्याज अनुदान, विद्युत शुल्क माफी, मुद्रांक शुल्क माफी, विद्युत कर अनुदान, सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे सक्षमीकरण, गुणात्मक स्पर्धा, संशोधन व विकास कार्य आणि तांत्रिक क्षेणीमध्ये वाढ इ. प्रोत्साहनांचा लाभ देय आहे. तसेच विशाल व अतिविशाल घटकांना शासनाने देकार पत्रामध्ये देवू केलेली प्रोत्साहने देण्यात येतात.

प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत अविकसित भागात जास्तीत जास्त गुंतवणूक होऊन उद्योगांना या योजनेतील प्रोत्साहनांचा जास्तीत जास्त लाभ मिळावा व या योजनेकडे जास्तीत जास्त उद्योग आकर्षित होऊन रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी २७९ तालुक्यांना ड+ दर्जा देण्यात आला आहे.

राज्यात गुंतवणूक वाढीच्या खालील नवीन योजना जाहीर केल्या आहेत.

१) माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५.
२) राज्याचे किरकोळ व्यापार धोरण.
३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६.
४) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण-२०१६, दिनांक ११ एप्रिल, २०१६.
५) राज्यातील महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण, दिनांक १४ डिसेंबर, २०१७.

६) अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण-२०१८, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८.

७) महाराष्ट्र इलेक्ट्रीक व्हेईकल प्रोत्साहन धोरण-२०१८, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८.

८) महाराष्ट्र काथ्या धोरण-२०१८, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८.

९) महाराष्ट्राचे लॉजिस्टिक पार्क धोरण-२०१८, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८.

१०) महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९, दिनांक ७ मार्च, २०१९.

तसेच गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी मेक इन इंडिया ही परिषद तसेच मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स आयोजित केला होता.

उद्योग विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये सुधारित खरेदी धोरण लागू करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेची दरकरार पध्दती संपूष्टात आणली असून, रुपये ३.०० लक्ष वरील खरेदीकरीता ई-निविदा कार्यपध्दती बंधनकारक करण्यात आली आहे. सदर खरेदी धोरणामध्ये अभिव्यक्ती स्वारस्य पध्दतीने खरेदी, स्वीस चॅलेंज खरेदी पध्दती इ. नाविन्यपूर्ण खरेदी पध्दतीचा समावेश करण्यात आला आहे. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत अंध, अपंग यांच्या संस्था व हातमाग महामंडळ/महासंघ (महाटेक्स) यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची दरनिश्चिती, दोन किंवा अधिक प्रशासकीय विभागांना लागणाऱ्या वस्तूंची खरेदी व शासकीय खरेदीच्या संदर्भात धोरण आखणी करण्याची जबाबदारी ठेवण्यात आली आहे.

सुधारित खरेदी धोरणामध्ये सुक्ष्म व लघु उद्योगांमार्फत खरेदी करण्यासाठी २४१ वस्तू राखीव ठेवण्यात आल्या आहेत. राखीव वस्तूंची १०० टक्के खरेदी सुक्ष्म व लघु उद्योगामार्फत करताना, त्यापैकी २० टक्के खरेदी अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या उद्योजकांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. खरेदीसाठी राखीव नसलेल्या वस्तूबाबत २० टक्के खरेदी सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी न्युनतम (एल-१) दराने राखीव ठेवण्यात आली असून, या २० टक्के पैकी ४ टक्के खरेदी अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या उद्योजकांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

स्थानिक विकास निधी अंतर्गत द्यायच्या कामाबद्दल आरोग्य विषयी बाबींच्या आणि इतर बाबीचा समावेश करण्याबाबत

(१७) ४३७३ (१७-०७-२०२०) डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक विकास निधी अंतर्गत द्यायच्या कामाबद्दल आरोग्यविषयी व इतर बाबींचा समावेश करण्याबाबत उदा. रुग्णवाहिका विकत घ्यायला परवानगी देण्याबाबत तसेच आरोग्य मेळावे यासाठीच्या खर्चास परवानगी मिळण्याबाबत,

(२) तसेच, कौशल्य विकासासाठी रोजगार मिळावे व स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी ज्या कार्यशाळेला यासंदर्भात संम्मेलन घ्यायचे असेल अशा कार्यशाळेला परवानगी मिळणार आहे काय,

(३) असल्यास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी एखादे चर्चा सत्र असेल किंवा वर्कशॉप असेल किंवा संम्मेलन असेल यासाठी सुध्दा खर्च करण्यास परवानगी मिळणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (२६-१०-२०२०) : (१), (२) व (३) अ) नियोजन विभागाच्या क्र.स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक १२/०७/२०१६ अन्वये निश्चित केलेल्या सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचनेप्रमाणे परिच्छेद ३.२० प्रमाणे "जिल्हा शल्य चिकित्सक/सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत शासकीय रुग्णालये, स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांची रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, नगरपालिका रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी रुग्णवाहिका व शववाहिका" उपलब्ध करुन देता येते.

(ब) तसेच नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र.स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ अनुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत "विशेष बाब" म्हणून मान्यता देण्याबाबतची तरतूद असून या शासन निर्णयातील "परिच्छेद-अ" नुसार एखाद्या प्रस्तावान्वये आमदार निधीच्या मार्गदर्शक तत्वानुसार अनुज्ञेय नसलेल्या कामातून "शासकीय मालमत्ता निर्माण होणार असल्यास" त्यास "विशेष बाब"

म्हणून मान्यता देण्याची तरतूद आहे. या तरतुदीनुसार शासकीय रुग्णालयांना "वैद्यकीय यंत्रसामुग्री" उपलब्ध करुन देण्यास "विशेष बाब" म्हणून शासन स्तरावरून मान्यता देता येते. तसेच या शासन निर्णयातील "परिच्छेद ब-१" अन्वये "आरोग्य शिबिरे" भरविण्यास देखील "विशेष बाब" म्हणून शासन स्तरावरून मान्यता देता येते. तथापि, "कौशल्य विकासासाठी रोजगार मेळावे, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यशाळा अथवा संम्मेलन भरविणे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी चर्चासत्र किंवा वर्कशॉप किंवा संम्मेलन" आयोजित करणे ही कामे अनुज्ञेय नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी विभागाच्या योजनांच्या अनुदानाचा लाभ लाभार्थ्यांना देण्याबाबत

(१८) ४३७५ (०९-०९-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, क्रॉप-सॅप योजना, उन्नत शेती शेतकरी समृध्द योजना, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना यासारख्या योजना राबविण्यात येत असून सदर योजना मंजूर होऊन २-२ वर्षे उलटून गेली परंतु लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त योजनांच्या अनुदाना लाभ लाभार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दादाजी भुसे (२७-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

नमूद केलेल्या योजनांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत

(१९) ४३७६ (०९-०९-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५११ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी राज्यभर आंदोलने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (२६-११-२०२०) : (१) हे खरे नाही. राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनाच लागू आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

आदिवासी विभागांतर्गत बाहयस्त्रोताने नियमबाहय कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्याबाबत

(२०) ४३८५ (१४-०९-२०२०) डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागांतर्गत क्वेस्ट, काळा घोडा, मुंबई या भाड्याच्या इमारतीमध्ये बाहयस्त्रोताने नियमबाहय कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विभागाने या भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीसाठी कोटयावधी रुपये इमारत भाडे व बाहयस्त्रोत कर्मचाऱ्यांसाठी लाखो रुपये वेतन देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याची आर्थिक परिस्थिती पहाता अशा प्रकारे भाडे तत्वावरील इमारत भाडे बंद करण्याबाबत व बाहयस्त्रोतातील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका रद्द करण्याबाबत शासनाकडे तक्रारी आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (२८-१०-२०२०) : (१) नाही, हे खरे नाही.

(२) मागील दोन वर्षात भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीसाठी वार्षिक सरासरी रुपये ९३,५७,३४८/- इतके भाडे अदा करण्यात आले आहे. तसेच मागील दोन वर्षात कार्यालयातील सर्व कार्यरत तज्ञ व्यक्तींच्या (बाहयस्त्रोत कर्मचारी) मानधनासाठी वार्षिक सरासरी रुपये १,१०,५६,३५७/- इतके मानधन अदा करण्यात आलेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) आदिवासी विकास विभागाची कार्यकक्षा ही वैविध्यपूर्ण असून जिल्हा वार्षिक योजना, राज्य योजना, केंद्र योजना, विविध १६ मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना निधी वितरित करणे ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य, कृषी, रोजगार, पायाभूत सुविधा, पशुसंवर्धन, ऊर्जा, उद्योग, महसूल व वने, जलसंपदा व जलसंधारण इत्यादी क्षेत्रांसाठी निधीचा विनियोग व फलनिष्पत्ती तपासण्यासाठी तसेच नियोजन व सनियंत्रणासाठी क्वेस्ट उपकेंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर उपकेंद्र हे केंद्रिय योजनेतून सुरु करण्यात आलेले असून ते केंद्र शासनाकडून मंजूर केंद्रिय प्रकल्पाचा भाग असून या केंद्राचा आवर्ती खर्च सुध्दा केंद्र शासनाकडून मंजूर व वितरित करण्यात येतो.

कोरोना पार्श्वभूमिमुळे राज्याची आर्थिक स्थिती विचारात घेऊन सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात नवीन कंत्राटी तज्ञ मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आलेली नाही तसेच शासनाच्या काटकसरीचे धोरण लक्षात घेऊन

क्वेस्ट कार्यालयातील सद्य:स्थितीत मुदत कालावधी संपलेल्या कंत्राटी तज्ञ मनुष्यबळ यांना मुदत वाढ देण्यात आलेली नाही. शासकीय कामकाजात नाविन्यपूर्ण योजनांचे संकल्पन करून त्यांचे देखरेख व सनियंत्रण करून योजनांमधून फलनिष्पती प्राप्त करून घेण्यामध्ये क्वेस्ट कार्यालयाचे योगदान महत्वपूर्ण असल्याने क्वेस्ट कार्यालय सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खानिवडे (ता.वसई, जि.पालघर) येथे जिल्हा रुग्णालय सुरु करण्याबाबत

(२१) ४३९४ (१७-०७-२०२०) श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानिवडे (ता.वसई, जि.पालघर) येथे दिनांक २७ जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हा ग्रामीण रुग्णालयास मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा ग्रामीण रुग्णालयास मान्यता देवूनही रुग्णालय सुरु न झाल्यामुळे रुग्णांची उपचाराअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णांच्या उपचारासाठी खानिवडे येथे जिल्हा रुग्णालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२६-१०-२०२०) : (१) हे खरे आहे.

खानिवडे येथे दिनांक २७ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयानुसार ग्रामीण रुग्णालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामासाठी निकषानुसार जागा उपलब्ध होऊ शकली नाही. आता वन विभागाकडून ०.९९ हेक्टर जागा उपलब्ध झाली असून सदर जागाचे सिमांकन व हद्द निश्चित करुन हस्तांतरण करुन

घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. मौजे खानिवडे व परिसरातील रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र, मांडवी व ग्रामीण रुग्णालय, विरार मार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्ह्यातील विकास कामांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२२) ४४१३ (१४-०९-२०२०) श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा नियोजन समितीच्या अनुदानात ६७ टक्के कपात करण्यात आल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनुदानात ६७ टक्के कपात करण्यात आल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या ३० टक्के निधीमधून शहरातील विकासकामे करणे शक्य नसल्यामुळे सदर विकास कामांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (०५-११-२०२०) : (१) औरंगाबाद जिल्ह्याकरीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत रुपये ३२५.५० कोटी अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी “कोरोना” विषाणूमुळे उद्भवलेल्या साथीची परिस्थिती विचारात घेऊन दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत तरतूदीच्या ३३ टक्के मर्यादेत रुपये १०७.४१ कोटी निधी वितरित करण्यात आलेला आहे. उर्वरित निधी दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत उपलब्ध करुन देण्याबाबत नियोजित आहे.

(२) व (३) औरंगाबाद जिल्ह्याकरीता संबंधित प्रशासकीय विभागामार्फत शहर विकासाबाबतीत राबविण्यात येत असलेल्या राज्यस्तरीय योजनांतर्गतही सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध होण्याकरीता प्रस्ताव सादर करता येतील.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पोकरा योजनेंतर्गत फळपीक लागवडीस पूर्वसंमती देण्याबाबत

(२३) ४४२० (१६-०७-२०२०) श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरु करण्यात आलेल्या पोकरा योजनेंतर्गत फळपीक लागवडीस बीड जिल्ह्यासाठी पूर्वसंमती दिली गेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फळपीक लागवडीचा कालावधी निघून जात असल्याने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फळपीक लागवडीसाठी परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोकरा योजनेंतर्गत फळपीक लागवडीस पूर्वसंमती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दादाजी भुसे (२६-११-२०२०) : (१) अंशत: हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत फळपीक लागवडीसाठी दिनांक ०२/११/२०२० अखेर बीड जिल्ह्यातील ४१५८ पात्र अर्जांना पूर्वसंमती देण्यात आली असून फळपीक लागवडीचे काम पूर्ण केलेल्या ६७७ पूर्वसंमती प्राप्त शेतकऱ्यांना डीबीटीव्दारे रुपये २,६६,८३,६५६/- अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

बीड जिल्ह्यात स्वस्त धान्य दुकानामध्ये काळाबाजार होत असल्याबाबत

(२४) ४४६५ (०८-०९-२०२०) श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात सातत्याने स्वस्त धान्य दुकानामध्ये होत असलेल्या धान्याच्या काळाबाजारामुळे गोरगरिबांना अन्नाचा पुरवठा होत नसल्याचे मासे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वस्त धान्य दुकानामध्ये होणाऱ्या काळाबाजारास पुरवठा विभागातील अधिकारी तसेच कर्मचारी यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वस्त धान्य दुकानांमधील काळाबाजार रोखण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (२७-११-२०२०) : (१) व २) हे खरे नाही.

(३) शासनाच्या दिनांक २४/०४/२०२० च्या आदेशानुसार बीड जिल्ह्यात रास्तभाव दुकानांच्या तपासणीसाठी भरारी पथक नेमण्यात आले होते. या भरारी पथकामार्फत केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील २९ रास्तभाव दुकानांचे प्राधिकार पत्र निलंबित करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बहुजन-गिरीजन वर्गाला मदत होईल असे आर्थिक पॅकेज मिळणेबाबत

(२५) ४४७४ (१४-०९-२०२०) श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लॉकडाऊनच्या अनुषंगाने समाजातील बहुजन-गिरिजन वर्गाला मदत होईल अशा आर्थिक पॅकेजची शासनाकडून अपेक्षा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सुतार, लोहार, कासार, चांभार, कुंभार, वडार, कैकाडी, भोई, कोळी, रंगारी, शिंपी, धोबी, तुतारीवाले, बॅन्डवाले, पानपट्टीवाले, पुजारी, हातगाडीवाले माथाडी, चहा टपरीवाले, छोटे भाजीपाला विक्रेते, छोटे मच्छीमार, छोटे मंडपवाले, छोटे पत्रकार, गवंडी, बेलदार, वैदू, ऍटो

रिक्षाचालक, तीनचाकी सायकल रिक्षाचालक, घोडागाडीवाले, गोंधळी, पारधी, न्हावी, गोसावी, मसणजोगी, जोगी, साळी, बेलदार आदी समाजांसाठी एखादे पॅकेज जाहीर केले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (२६-११-२०२०) : (१), (२) व (३) याबाबत उद्योग विभागास कळविण्यात येईल.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील दिपक फर्टीलायझर्स कारखान्यातील कामगारांवर अन्याय होत असल्याबाबत

(२६) ४४८६ (१४-०९-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणूंच्या संसर्गामुळे हजारो कारखाने बंद असून देखील अत्यावश्यक सेवेच्या निमित्ताने तळोजा औद्योगिक वसाहतीतील दिपक फर्टीलायझरच्या कारखान्यात हजारो कामगार मुंबई, मुंब्रा, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, पनवेल व पेण इत्यादी विविध भागातून कामावर येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यावश्यक सेवेमध्ये येणाऱ्या कारखान्यांमधील मजुरांसाठी येण्या-जाण्याची व्यवस्था व खाण्या-पिण्याची व्यवस्था कारखान्याने करावयाची असताना देखील सदर कारखान्याने अशा प्रकारची कुठलीच व्यवस्था केली नाही अशी तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई (२४-११-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील मे.दिपक फर्टीलायझर पेट्रोकेमिकल्स लिमिटेड या कंपनीमध्ये आजू बाजूच्या परिसरातील कामगार कामावर येत आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

मे.दिपक फर्टीलायझर पेट्रोकेमिकल्स लिमिटेड यांनी त्यांच्या कारखान्यामध्ये कामावर येणाऱ्या कामगारांसाठी येण्या-जाण्याबाबत, जेवणाबाबत, कंपनीमधील निर्जंतुकीकरणाबाबत तसेच कर्मचाऱ्यांची आवश्यकतेनुसार राहण्याची व्यवस्था केली असून याबाबत कंपनीने दिनांक १०/०७/२०२० च्या पत्रान्वये खुलासा केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे अंधेरी (ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर) येथील जमीन गैरव्यवहाराबाबत

(२७) ४५१६ (०९-०९-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंधेरी (ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर) येथील सर्व्हे नंबर १०५ अ, ब व क क्रमांक २११ चे एस एस १० गिल्बर्ट हिल क्षेत्र ६३९६.३२ चौरस मीटर या मे.बॉम्बे कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन कंपनीस प्रदान केलेले जमिनीच्या गैरव्यवहाराची चौकशी करुन कारवाई करण्यासंदर्भात लाईफ इन लाईट या संस्थेने पाठवलेले पत्र जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीस उक्त जमीन दिनांक १ ऑगस्ट, १९४३ पासून १७ वर्षाच्या कालावधीसाठी ठराविक प्रयोजनासाठी विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार शासनाने मंजूर केलेल्या भाडे पट्ट्याच्या कालावधीकरीता दिली असून त्याचा कालावधी दिनांक ३० जुलै, १९६० रोजी संपुष्टात आला असूनही शासनाने भाडेपट्टी त्याचे नुतनीकरण केलेले नसताना तहसिलदार व संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी बेकायदेशीरपणे दिनांक ३ एप्रिल, १९९६ रोजी कंपनीस जमिनीतील कुंपण घालण्याबाबत आणि भिंत बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पेश अजमेरा यांनी नाम साधर्म्य असलेली कन्स्ट्रक्शन बनावट कंपनी तयार करुन जमिनीची भाडेपट्ट्याची मुदत संपल्यावर ३६ वर्षांनी नुतनीकरणाचा अर्ज सादर करुन बेकायदेशीरपणे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजीपर्यंत जागेच्या भाडे पट्ट्याचे नुतनीकरण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषी अधिकारी व अल्पेश अजमेरा यांच्यावर कारवाई करुन बेकायदेशीर जमीन वापरल्याप्रकरणी दंडासह वसुली करणेबाबत व सदर जमीन शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात ये आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (१०-११-२०२०) : (१) व (२) मौजे अंधेरी, ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर येथील सर्वे नं. १०५अ, न.भू.क्र.२११ पै.,एस.एस.१० गिल्बर्ट हिल क्षेत्र ७६५० चौ.वार. (६३९६.३२ चौ.मी.) या मे.बॉम्बे कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन कंपनीस प्रदान केलेल्या जमिनीबाबत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांना उद्देशुन लाईफ इन लाईट या संस्थेने लिहिलेले पत्र जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना दिनांक १४/०८/२०१७ रोजी प्राप्त झाले होते.

मौजे अंधेरी येथील उक्त नमूद जमीन मे.बॉम्बे कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन कंपनीस दिनांक ०१/०८/१९४३ पासून १७ वर्षाच्या कालावधीसाठी क्रशर उभारणे, खाणीतून काढलेल्या गौण खनिजाचा साठा करणे व कामगारांसाठी झोपड्या बांधणे इत्यादी प्रयोजनासाठी ठराविक अटी व शर्तीवर भाडेपट्टयाने देण्यात आली होती. सदर भाडेपट्ट्याची मुदत दिनांक ३१/०७/१९६० साली संपुष्टात आली असून, ही मुदत पुढे १५ वर्षांनी वाढवून मिळण्याबाबत संस्थेने विनंती केली होती. तसेच, सदर कंपनीने जमिनीचे अतिक्रमणपासून संरक्षण व्हावे म्हणून जमिनी सभोवार आवार भिंत बांधण्याकरीता त्यांच्या दिनांक २९/०३/१९९६ च्या पत्रान्वये परवानगी मागितली. त्यानुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०३/०४/१९९६ रोजीच्या पत्रान्वये

तात्पुरते तारेचे कुंपण घालण्यास परवानगी दिली होती. तसेच सदर परवानगीव्दारे कंपनीस कोणत्याही प्रकारचा हक्क प्राप्त होणार नाही असे देखील स्पष्ट करण्यात आले होते.

(३) व (४) श्री.अल्पेश अजमेरा यांच्या अर्जावरून मे.बॉम्बे कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन कंपनीच्या नावे उक्त भाडेपट्टयाचे नुतनीकरण दिनांक ३१/१२/२०२८ पर्यंत तत्का. जिल्हाधिकारी यांनी दिनांक २७/०७/२००४ च्या आदेशान्वये केले आहे. सदर आदेशास तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक ३१/०७/२००७ रोजीच्या अर्धन्यायीक आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. तद्नंतर जिल्हाधिकारी यांच्या दिनांक २७/०४/२०१२ रोजीच्या आदेशान्वये अनर्जित उत्पन्नाची रक्कम वसूल करून मे.दर्शन डेव्हलपर्स प्रा.लि. यांचेकडे सदर भाडेपट्टयाचे हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रश्नाधीन जमिनीवर मे.दर्शन डेव्हलपर्स प्रा.लि. करीत असलेल्या बांधकामास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १६/०१/२०१५ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिली होती. त्यावर मे.दर्शन डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी दाखल केलेल्या पुनरिक्षण अर्जावर मा.राज्यमंत्री (महसूल) यांनी सुनावणीअंती दिनांक २८/०९/२०१६ रोजी आदेश पारित करून पुनरीक्षण अर्ज मंजूर केला. या आदेशाविरोधात मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४/०४/२०१७ रोजीच्या आदेशान्वये निर्देशित केल्याप्रमाणे मा.मंत्री (महसूल) यांनी पुनर्विलोकन प्रकरणी सुनावणी घेऊन दिनांक ३१/०१/२०१९ रोजी आदेश पारित केले असून मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे दिनांक २८/०९/२०१६ चे आदेश रद्द केले आहेत. तसेच, सदर आदेशान्वये प्रश्नाधीन जमिनीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाच्या आदेशाबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी चाचणी न्यायालय या नात्याने हितसंबंधीतांना नैसर्गीक न्याय तत्वानुसार संधी देऊन भाडेपट्याबाबत पुरावे प्राप्त करून घेऊन उचित आदेश पारित करावेत असे आदेशित केले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात वेळोवळी सुनावणी आयोजित करण्यात आली असून या प्रकरणात दिनांक ०७/०४/२०२० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. तथापि, कोरोना प्रादुर्भावामुळे सदर सुनावणी होऊ शकलेली नाही. सदर प्रकरण सुनावणीवर प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुरबाड (जि.ठाणे) येथील ऐतिहासिक नाणेघाटाच्या सुशोभिकरणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(२८) ४५२० (१६-०७-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील ऐतिहासिक नाणेघाटाच्या सुशोभिकरणाचे काम आयुष कन्स्ट्रक्शन, नीलांजन एंटरप्राइजेस व दत्त कन्स्ट्रक्शनच्या कंत्राटदारांनी वनक्षेत्रपाल यांच्या संगनमताने निकृष्ट दर्जाचे करुन काही ठिकाणी काहीच कामे न करता देयके मंजूर केली असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे चौकशीसाठी स्थापन केलेल्या समितीने सदर कामात गैरव्यवहार झाल्याचा अहवाल सादर केला असल्याची बाब दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाणेघाटाच्या सुशोभिकरणासाठी २६ किलोमीटर लांबून दगड आणल्याचे बनावट अंदाजपत्रक तयार करुन प्रशासन व ठेकेदार यांच्या परस्पर संगनमताने ७५ लाख रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकरणात दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (१७-०९-२०२०) : (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ ठाणे यांनी सविस्तर चौकशी केली आहे. सदर चौकशी अहवालामध्ये सदर कामात गैरव्यवहार झाल्याबाबत नमूद केलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उस्मानाबाद नगरपरिषदेच्या हद्दीतील राघूचीवाडी व केस्थळवाडी तसेच जाधववाडी ग्रामपंचायतीचा क्षेत्र वगळण्याबाबत

(२९) ४५२२ (१४-०९-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद नगरपरिषदेच्या हद्दीत बदल करून त्यातील राघूचीवाडी व केस्थळ वाडी तसेच जाधववाडी ग्रामपंचायतीचा क्षेत्र वगळण्याबाबत संबंधित भागातील नागरिकांची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर भाग नगरपालिका हद्दीतून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (२७-११-२०२०) : (१) हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने, उस्मानाबाद नगरपरिषदेच्या हद्दीतून राघुचीवाडी व केकस्थळवाडी वगळण्याबाबतची प्राथमिक उद्घोषणा निर्गमित करण्यात आली आहे.

मा.न्यायालयाने अन्य प्रकरणी संक्रमणात्मक क्षेत्र किंवा लहान नागरी क्षेत्र किंवा मोठे नागरी क्षेत्र अस्तित्वात आल्यानंतर ते पुन्हा ग्रामीण क्षेत्र म्हणून जाहीर करता येत नसल्याबाबत दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार, उक्त प्राथमिक उद्घोषणा रद्द करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

यास्तव जाधववाडीचे क्षेत्र वगळण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गुजरात समुद्र हद्दीतील उंबरगाव येथे नांगरलेल्या बोटीवरील राज्यातील खलाशांवर अमानुष वर्तन केल्याबाबत

(३०) ४५२३ (२०-०७-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुजरातच्या विविध बंदरातून घरी परतण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व खलाशी उंबरगाव येथील बंदरावर उभे असताना येथून काही खलाशांना गुजरात व सिल्वासा येथे उतरवून उर्वरित खलाशी महाराष्ट्रात परत येण्यासाठी थांबले असताना गुजरात पोलिसांनी तेथे येऊन त्यांना घेरुन ताबडतोब परत जा अन्यथा गोळ्या घालू अशा प्रकारची धमकी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धमकीनंतर खलाशांनी नांगरलेल्या बोटींचे दोरखंड कापून त्यांना ताबडतोबीने परत जाण्यासाठी पुन:श्च एकदा धमकी दिली स्थानिक नागरिकांनी बोटींवर दगडफेक केल्याने खलाशी जखमी होऊ लागले त्यानंतर तीन दिवस उपाशी असलेले सर्व खलाशी प्रचंड दहशतीमध्ये मुंबईकडे येण्यासाठी परत निघाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (२४-११-२०२०) : (१) व (२) सदर प्रकाराबाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त नाही.

तथापि, पालघर जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२० मध्ये १२३ बोटींव्दारे आलेल्या मच्छिमार बांधवांना डहाणू व घोलवड येथील जेट्टींनवर उतरविण्यात आले व त्यांची वैद्यकीय तपासणी करुन त्यांना मूळ गावी जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था करुन सोडण्यात आले.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणात निसर्ग चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत

(३१) ४५३५ (२०-०७-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात निसर्ग चक्रीवादळामुळे नारळ पोफळीच्या बागांप्रमाणेच समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छिमार समाजाचे नुकसान झाल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निसर्ग चक्रीवादळाने बहुसंख्य मच्छिमारांच्या बोटी, इंजिन, जाळ्यांचे आणि सुख्या मासळीचे नुकसान झाले असून सदरचे नुकसान रुपये २५ कोटींपेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निसर्ग चक्रीवादळात नुकसानग्रस्त मच्छिमारांना केलेली मदत ही तुटपुंजी असल्याने चक्रीवादळग्रस्त मच्छिमारांची शासनाने फसवणूक केली असल्याचा आरोप मच्छिमार संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसानग्रस्त मच्छिमारांना वाढीव रक्कमेची तरतूद करुन मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (०२-११-२०२०) : (१) होय, खरे आहे.

(२) व (३) होय, अंशत: खरे आहे.

(४) निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या रायगड व रत्नागिरी जिल्हयांना एक विशेष बाब म्हणून राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या (SDRF) निकष व दरामध्ये वाढ करून मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून वाढीव दरानुसार रुपये १८६.९६ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाच्या धरण पुनर्वसन व सुधारणा प्रकल्पाबाबत

(३२) ४५७१ (०९-०९-२०२०) श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या धरण पुनर्वसन व सुधारणा प्रकल्पांतर्गत राज्यातील धरणाच्या दुरूस्तीसाठी जागतिक बँकेने माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान रुपये ९६० कोटीचा निधी मंजूर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी मंजूर करताना जागतिक बँकेने दुरूस्तीचे निकष ठरवून दिले असताना पुढील तीन ते चार वर्षात हा प्रकल्प होणार असून या मंजूर निधीतून राज्यातील लहान मोठी अशी एकूण १५० ते १७५ धरणांची दुरूस्ती करणे शक्य होणार आहे असे जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी मत व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील धरण दुरूस्तीचा अभ्यास करण्यासाठी जलसंपदा विभागाचे अभियंते, भूवैज्ञानिक, जलविद्यत क्षेत्रातील तज्ञ आदीचा समावेश असलेल्या राज्यस्तरीय १६ जणांची समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर राज्यस्तरीय समितीच्या एकूण किती बैठका झाल्या व त्यात कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (०३-११-२०२०) : (१) भारत सरकारच्या जलसंसाधन, नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालयाच्या दिनांक ०७ मार्च, २०१९ च्या पत्रानुसार धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२ व टप्पा-३ या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील १६७ प्रकल्पांकरीता रुपये ९४० कोटी इतक्या आर्थिक मर्यादेत निधीची तरतूद केलेली आहे.

(२) धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२ व टप्पा-३ यांची मुदत अनुक्रमे सन २०२० ते सन २०२६ व सन २०२४ ते २०३० अशी आहे. ऑगस्ट २०१९ मध्ये शासनाने राज्यातील एकूण १४० धरणांचा समावेश धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्पांतर्गत करणेस मान्यता दिलेली आहे.

(३) (अ) धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२ व टप्पा-३ अंतर्गत समाविष्ट प्रकल्पांचा अभ्यास करुन दुरुस्तीच्या उपाययोजना सूचविण्यासाठी शासनाने दिनांक १२/०६/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदेशनिहाय एकूण ४ धरण सुरक्षितता पुनर्विलोकन मंडळांची स्थापना केलेली असून त्यामध्ये जलसंपदा विभागातील बांधकाम/संकल्पन या विषयाशी संबंधित तज्ञ अभियंते तसेच केंद्र शासनाच्या मंजूर पॅनलवरील इतर राज्यातील भूगर्भशास्त्रज्ञ, जलशास्त्रीय वैज्ञानिक, भूंकप तज्ञ व इतर यांचा समावेश आहे.

(ब) शासनस्तरावर राज्यस्तरीय सुकाणू समिती State Level Steering Committee (SLSC) शासनाच्या इंग्रजी शा.नि.क्र. Gom.WRD/ Gr.No-MISC-२०१७/(१३९/१७)/IMW, दिनांक १२/०४/२०१९ अन्वये स्थापित करण्यात आली आहे. या समिती मार्फत प्रकल्पांचा DRIP अंतर्गत प्रकल्पाचा समावेश करणे, नियोजन करणे, प्रगतीचा आढावा घेणे या बाबी समाविष्ट आहेत.

(४) (अ) धरण सुरक्षितता पुनर्विलोकन मंडळे (Dam Safety Review Panel (DSRP) मार्फत आतापर्यंत २५ प्रकल्पांच्या भेटी पार पडल्या आहेत. त्यावर आधारित १२ प्रकल्पांच्या प्रशासकीय मान्यतेचा रुपये ६२४ कोटी रकमेचा प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(ब) राज्यस्तरीय सुकाणू समिती (State Level Steering Committee) (SLSC) ची आतापर्यंत एक बैठक संपन्न झालेली असून, क्षेत्रिय अभियंत्यांना धरणाच्या पुनर्स्थापना करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले असून राज्यस्तरावर DRIP II & III मधील प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र मालक तंबू संघटनेने केलेल्या मागण्यांबाबत

(३३) ४५८२ (२२-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाळेबंदीमुळे माहे मार्च, २०२० पासून गावागावातील यात्रा बंद झाल्याने ग्रामीण जनतेला चित्रपट दाखविणाऱ्या फिरत्या चित्रपटगृहांचे आर्थिक व्यवहार बंद झाल्याने राज्यातील मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील तंबू मालक आणि त्यावर उपजिविका असलेल्या एक हजार कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र तंबू संघटनेने तंबू मालकांना वार्षिक अनुदान आणि मासिक निवृत्तीवेतन देण्याची व यात्रेतील परवानगीसाठी एक खिडकी योजना सुरू करावी तसेच फिरत्या चित्रपटगृहासाठी वीज जोडणी व इतर परवानग्या मिळविणे सुलभ व्हावे अशी मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र मालक तंबू संघटनेने केलेल्या उपरोक्त मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (२५-११-२०२०) : (१), (२) व (३) कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मार्च, २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे देशातील बहुतांश उद्योग, व्यवसाय व त्यावर अवलंबून असलेल्या जतनेच्या उदर्निवाहावर परिणाम झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, या संदर्भात महाराष्ट्र मालक तंबू संघटनेकडून मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडे निवेदन प्राप्त झाल्याचे मुख्यमंत्री सचिवालयाच्या ई-ऑफिस प्रणालीवर आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील सिध्दार्थ उद्यानातील प्राणी संग्रहालयात वाघिणीचा मृत्यू झाल्याबाबत

(३४) ४५९३ (१४-०९-२०२०) श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील सिध्दार्थ उद्यानातील प्राणी संग्रहालयात ६ वर्षाच्या करीना वाघिणीच मृत्यू झाल्याची बाब माहे जून, २०२० च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाघिणीच्या दोन्ही किडन्या रिकाम्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करीना वाघिणीची कोरोना टेस्टसाठी स्वॅब घेण्यात आले होते त्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, सदर प्राणी संग्रहालयातील इतर प्राण्यांना कोरोनाचे संक्रमण होऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (१३-११-२०२०) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) करीना वाघिणीची कोरोना टेस्टसाठी स्वॅब घेण्यात आले होते, परंतु प्राण्यांचे कोरोना चाचणी करण्याचे साहित्य उपलब्ध नव्हते. तथापि, सदर वाघिणीमध्ये कोरोनाची कुठलीही लक्षणे आढळून आलेली नाही. तसेच शवविच्छेदनामध्ये श्वसनसंस्थेचा वा फुफुसाचा संसर्ग आढळून आलेला नाही.

(४) प्राणी संगहालयातील इतर प्राण्यांना कोरोनोचे संक्रमण होऊ नये म्हणून केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे प्रोटोकॉलनुसार प्राणी संग्रहालयामध्ये आवश्यक असलेल्या सर्व खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेच्या निकालाबाबत

(३५) ४५९४ (१४-०९-२०२०) श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बाब माहे जून, २०२० च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पूर्व परिक्षेसाठी ३ लाख ६० हजार ९९० विद्यार्थी बसले असतानाही ९९.९९ टक्के विद्यार्थी नापास झाले असून ३ लाख ६० हजार ५७० विद्यार्थी नापास झाल्यामुळे त्यांच्यात नैराश्य पसरुन व्यसनाधीनता वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रत्येक वर्षी शासकीय पदांची भर्ती आराखडा तयार करत असताना त्याचे वय आणि निवृत्तीचे वय यामध्ये फार कमी तफावत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील आयुष्य यशस्वीपणे जगण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे (१७-११-२०२०) : (१) हे खरे आहे.

राज्य सेवा परीक्षा-२०१९ चा अंतिम निकाल दिनांक १९/०६/२०२० रोजी जाहीर करण्यात आला.

(२) राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०१९ अंतर्गत राज्य शासनाने एकूण ४२० रिक्त पदे भरण्यासाठी आयोगास मागणीपत्र सादर केले होते. त्यामुळे आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी अनेक उमेदवारांनी अर्ज सादर केले तरीही मागणी पत्रातील पदांच्या संख्ये इतकेच म्हणजेच ४२० उमेदवारांचीच निवड करणे क्रमप्राप्त होते.

आयोगाने ४२० पदे भरण्याची जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर आयोगास एकूण ३,६०,९९० उमेदवारांनी अर्ज केले होते. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची तीन टप्प्यात आयोगाने परीक्षा घेतली. ४२० पदांसाठी एकूण ४१३ उमेदवार शिफारस पात्र ठरले.

सबब शासनास जितकी पदे भरावयाची आहेत, त्या पदांसाठी आयोगामार्फत जाहिरात दिल्यानंतर त्यानुसार अनेक उमेदवारांनी अर्ज दाखल केला तरीही जाहिरातीत नमूद केलेल्या पदसंख्येइतकेच उमेदवार शासकीय पदाच्या नियुक्तीसाठी गुणवत्तेनुसार आयोगामार्फत शिफारस केले जातात. त्यामुळे मागणीपत्राच्या पदसंख्येइतके गुणवत्तेवर शिफारस केलेले उमेदवार वगळता अन्य उमेदवारांना पास किंवा नापास ही संकल्पना लागू होत नाही.

(३) व (४) शासन सेवा प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे तसेच मागासवर्गीय उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे करणेबाबतचा निर्णय शासनाने दिनांक २५/०४/२०१६ च्या शासन निर्णया अन्वये घेतला आहे. सद्य:स्थितीत गट ड व गट अ ते गट क पदासाठी सेवानिवृत्तीचे वय अनुक्रमे ६० व ५८ वर्षे आहे.

तसेच आयोगाच्या परीक्षेसाठी अर्ज करणारे विद्यार्थी हे कमाल वयोमर्यादेपर्यंत आयोगाच्या परीक्षेस बसण्यासाठी पात्र आहेत. कमाल वयोमर्यादेपर्यंत त्यांना किती वेळा परीक्षेला बसावे यासाठीचे कमाल बंधन केंद्र शासन अथवा अन्य राज्य शासनाप्रमाणे महाराष्ट्र राज्य शासनाने घातलेले नाही. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना परीक्षांना बसण्याच्या जास्त संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने राज्य शासनाने नियुक्तीचे किमान वयोमर्यादा वाढविली आहे ज्यामुळे सर्व विद्यार्थी पदवीनंतर कमाल वयोमर्यादेपर्यंत अनेक वेळा आयोगाची परीक्षा देण्यासाठी पात्र राहतील व ते परीक्षेव्दारा शिफारस पात्र होणसाठी प्रयत्न करू शकतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

काटेपूर्णा (ता.बार्शी टाकळी, जि.अकोला) आणि वान (ता.तेल्हारा) या दोन धरणांच्या ठिकाणी भुकंपमापक यंत्र बसविण्याबाबत

(३६) ४६०६ (३०-०७-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटेपुर्णा (ता.बार्शी टाकळी, जि.अकोला) आणि वान (ता.तेल्हारा) या दोन धरणांच्या ठिकाणी भुकंपमापक यंत्र बसविण्याची कार्यवाही करण्याचा आदेश जिल्हाधिकारी, अकोला यांनी पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याना दिल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ठिकाणी भुकंपमापक यंत्र बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरहू यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (०२-११-२०२०) : (१) होय, अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, अकोला यांचे काटेपुर्णा प्रकल्पाचे भुकंपमापक यंत्र कार्यान्वित करणेबाबतचे दिनांक २३/०६/२०२० रोजीचे पत्र कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला या क्षेत्रिय कार्यालयास दिनांक १०/०७/२०२० रोजी प्राप्त झाले आहे. तथापि, जिल्हाधिकारी, अकोला यांचे वान प्रकल्पाकरीता भुकंपमापक यंत्र कार्यान्वित करणेबाबतचे पत्र क्षेत्रिय कार्यालयास अप्राप्त आहे.

(२) काटेपुर्णा प्रकल्पावर भुकंपमापक यंत्र बसविण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वावे (ता.खेड, जि.रत्नागिरी) या दुर्गम डोंगराळ गावातील वाड्यामध्ये खांब गंजलेल्या अवस्थेत असल्याने बदलण्याबाबत

(३७) ४६१२ (१७-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वावे (ता.खेड, जि.रत्नागिरी) या दुर्गम डोंगराळ गावातील गायकरवाडी, शिंदेवाडी, हरावडेवाडी, आलीमवाडी, भुवडवाडी व शिंबेवाडी या ७ वाड्यामधील तत्कालीन महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाच्यावतीने सुमारे ४० ते ५० वर्षापुर्वी वीज वाहनासाठी उभारलेले विजेचे खांब गंजलेल्या अवस्थेत असून पावसाळयात वादळी वाऱ्याने धोकादायक झोलेले खराब खांब मोडून पडण्याची शक्यता ग्रामस्थांनी महावितरणकडे केलेल्या तक्रारीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वावे ग्रामस्थांनी महावितरण कार्यालयाकडे तक्रारी करुनही सुमारे १ वर्षाचा कालावधी उलटला तरीही आजमितीस नवीन खांब उभारण्यात आले नसून केवळ ८ दिवसापूर्वी माडवे गावठाणवाडी येथील ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीनंतर धोकादायक झालेले विजेचे खांब अवघ्या चोवीस तासात बदलण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वावे गावातील ७ वाड्यामधील गंजलेले व धोकादायक झालेले ४७ विजेचे खांब विनाविलंब बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. नितिन राऊत (०४-११-२०२०) : (१) व (२) हे खरे आहे. मांडवे गावठाण येथील धोकादायक विद्युत खांब बदलण्याबाबत तेथील ग्रामस्थांची तक्रार प्राप्त झाली असून निसर्ग चक्रीवादळामुळे पडलेले विद्युत खांब बसविण्याचे काम चालू असताना मांडवे येथील धोकादायक विद्युत खांब बदलण्यात आले आहेत.

(३) महावितरण कंपनीमार्फत वावे गावातील ३७ पोल बदली करण्याचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आलेले असून ठेकेदारास कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. त्यापैकी २ पोल बदली करण्यात आलेले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.
(४) निसर्ग चक्रीवादळ व कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उर्वरीत काम करण्यात विलंब होत आहे.

सावरा (ता.अकोट, जि.अकोला) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

(३८) ४६२५ (२२-०७-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावरा (ता.अकोट, जि.अकोला) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, कनिष्ठ सहाय्यक, परिचर, डाटा एंट्री ऑपरेटर अशी १५ ते १६ पदे रिक्त असल्याचे माहे जुलै, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्ह्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असताना आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण येत असल्याने रिक्त पदांच्या भरतीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२७-१०-२०२०) : (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र सावरा (ता.अकोट, जि.अकोला) येथे १६ पदे मंजूर असून ११ पदे भरलेली आहेत व ५ पदे रिक्त आहेत.

(२) वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आले असून त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याबाबतची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाड्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

(३९) ४६३६ (०९-०९-२०२०) श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील अपूर्ण ४५ सिंचन प्रकल्प नियोजनपूर्वक पूर्ण करण्यास १७ ते १८ हजार कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवणे, कृष्णा मराठवाडा प्रकल्प, पार-गोदावरी जोड प्रकल्प या प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, शासनाने कृष्णा खोऱ्याचे पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पात ८५० कोटींची तरतुद केली असल्याने या कामास सुरुवात झाली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (०३-११-२०२०) : (१) मराठवाड्यात बांधकामाधीन अनुदानित ४३ प्रकल्प असून १ एप्रिल, २०२० अखेर संभाव्य उर्वरित किंमत रुपये १६७५९.९५ कोटी आहे.
(२) पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यातील दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी पाणी उपलब्ध करुन देणेबाबत नदीजोड प्रकल्पांबाबत विभागाने मंत्रिमंडळासमोर दिनांक ३०/०७/२०१९ रोजी सादरीकरण केले. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार गोदावरी खोऱ्यातील दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी व गिरणा उपखोऱ्यासाठी कोकणातून पाणी वळविण्याच्या

योजनांना तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पश्चिम वाहिनी नदीखोऱ्यातून अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविण्यासाठी प्राथमिक अभ्यास करण्यासाठी कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. समितीचा अहवाल विचाराधीन आहे. याशिवाय, एकूण १२ वळण योजना पूर्ण होवून पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणलोट क्षेत्रातून पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात आले आहे. अन्य १८ योजनांपैकी ७ योजना बांधकामाधीन असून ११ योजना भविष्यकालीन आहेत.

मराठवाड्याच्या कृष्णा खोऱ्यातील क्षेत्रास पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी कृष्णा-मराठवाडा प्रकल्पास उजनी जलाशयातून २१ अ.घ.फू. व सिना-कोळेगांव प्रकल्पाच्या खालील भागातील मुक्त पाणलोट क्षेत्रातून उपलब्ध होणारे २.६६ अघफू असे एकूण २३.६६ एवढे पाणी देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार कृष्णा मराठवाडा प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात सुरु असून प्रथम टप्प्यातील ७.०० अघफू ची कामे प्रगतीपथावर आहेत.

पार गोदावरी अंतर्गत उपसा सिंचन योजना-३ व ४ चे सर्वेक्षण पूर्ण असून सविस्तर प्रकल्प अहवालावरील अनुपालन प्रगतीपथावर आहे.

(३) सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी (कृष्णा भिमा स्थिरीकरण प्रकल्पासह) रुपये ८५० कोटींची तरतूद करण्यात आली असून प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यात ढगफुटीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

(४०) ४६३९ (१७-०७-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सैदापुर, अकोली, धामोरी, राजुरा, सरोदे, राजनापूर (खिनखिनी) (ता.मुर्तिजापुर, जि.अकोला) या ठिकाणी झालेल्या ढगफुटीमध्ये शेती वाहुन गेल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर आले असून अनेक ठिकाणी घरांचेही नुकसान झाले असून देखील शेतीचे व घरांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे देखील झाले नसल्याचे माहे जुलै, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय़,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करुन त्यांना मदत करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (०२-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

माहे जुलै, २०२० च्या पहिल्या आठवड्यात आलेल्या पावसामुळे नदी/नाल्यास आलेल्या पुरामुळे मौजे सैदापूर, अकोली, धामोरी, राजुरा, सरोदे राजनापूर (खिनखिन) या गावातील १७०.२० हे. आर क्षेत्रातील शेती/फळपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. नुकसानीबाबतचे पंचनामे पूर्ण झाले आहेत.

(२) राज्यात माहे जून ते ऑगस्ट, २०२० या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीचे संयुक्त पंचनामे करून आवश्यक मदतीबाबतचा प्रस्ताव आयुक्त (कृषी) यांच्यामार्फत शासनास पाठविण्याबाबत सूचना विभागीय आयुक्त यांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोना वायरसच्या संसर्ग काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याबाबत

(४१) ४६९२ (१८-०८-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना वायरसच्या संसर्ग काळात लॉकडाऊनमध्ये पहिल्या चार महिन्यात ६५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यात ५४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण मागील २० वर्षाच्या तुलनेत जास्त असून लॉकडाऊनमध्ये ३ महिन्यात सर्वाधिक आत्महत्या झाल्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनातर्फे कोणती आर्थिक मदत केली तसेच राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याच्यादृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (०२-११-२०२०) : (१) लॉकडाऊनच्या कालावधीत राज्यात माहे मार्च, २०२० ते माहे जून, २०२० या कालावधीत एकूण ६७६ आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत. त्यापैकी जिल्हास्तरीय समितीने १७५ आत्महत्यांची प्रकरणे पात्र केली असून १५७ प्रकरणे अपात्र केली आहेत. तसेच ३४४ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित असून पात्र प्रकरणांपैकी १३७ प्रकरणी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार प्रत्येकी रुपये १.०० लक्षची मदत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना देण्यात आली आहे.
(२) नागपूरमध्ये माहे मार्च, २०२० ते जून, २०२० या कालावधीत एकूण ६१ आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत. त्यापैकी जिल्हास्तरीय समितीने ६ प्रकरणे पात्र केली असून ६ प्रकरणे अपात्र केली आहेत. तसेच ४९ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित असून पात्र ६ प्रकरणी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार प्रत्येकी रुपये १.०० लक्षची मदत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

विभागात उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरुन राज्यात सन २०१५ ते सन २०१९ या कालावधीत संबंधित वर्षाच्या मार्च ते जून या चार महिन्यांच्या कालावधीतील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची आकडेवारी पहाता सन २०२० या वर्षात आत्महत्यांच्या प्रकरणात घट झालेली दिसून येते.

(४) आत्महत्यांच्या प्रकरणात घट झाल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्याने होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांसाठी केलेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार रुपये १.०० लक्ष इतकी मदत देण्यात येते.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) शेती पिकांसाठी पर्याप्त सुविधा उपलब्ध होण्यासाठी विदर्भातील आत्महत्येचे प्रमाण जास्त असलेल्या ६ जिल्ह्यांकरीता विशेष पॅकेजची योजना राबविण्यात आली.

२) शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना.

३) विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात आल्या.

४) शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुर्नरचना करण्यात आली आहे.

५) कर्ज माफी योजना, शेतमालाला हमीभाव, PK-KISAN यासारख्या योजनामार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर मेडिकलमध्ये कॅन्सर इन्स्टिट्यूटचे नकाशे पूर्ण होवून निधी अभावी निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

(४२) ४७०६ (१३-०८-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेडिकलमध्ये कॅन्सर इन्स्टिट्युटचे नकाशे पूर्ण होवून निधी अभावी निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याची बाब माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्करोग विभागात कोबाल्ट आणि ब्रेकरी थेरेपी या कालबाहय यंत्रावरच उपचार केले जात असून या यंत्रामध्ये बिघाड होत असल्याने अनेकदा बंद पडतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅन्सर इन्स्टिट्युटबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनाला आदेश दिल्यावरही निविदा प्रक्रिया सुरू न होण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, सन २०२० मध्ये कॅन्सर इन्स्टिट्युटच्या बांधकामाची जबाबदारी शासनाने एन.एम.आर.डी.ए. कडे वर्ग करत तातडीने पैसे देण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (२६-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

कंपनीच्या अभियंताने सदर यंत्र तात्काळ दुरुस्त करुन दिले. त्यामुळे रुग्णसेवेत कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही.

(३) सदर बांधकामाच्या आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर नागपूर महानगर प्रदेश विकास (NMRDA) प्राधिकरणाकडून निविदा प्रक्रियेबाबत कार्यवाही सुरु करण्यात येईल.

(४) सदर बांधकामाशी संबंधित लेखाशिर्षात सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध असून निधी उपलब्ध करून देणे संदर्भातील प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे बारामती (ता.बारामती, जि.पुणे) येथील माळेगाव इरिगेशन कॉलनी परिसरातील जागेवर अतिक्रमण केल्याबाबत

(४३) ४७५२ (१९-०८-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.रमेशदादा पाटील : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बारामती (ता.बारामती, जि.पुणे) येथील माळेगाव इरिगेशन कॉलनी परिसरातील जलसंपदा विभागाच्या गट नंबर ९२/१/३१/१ मधील १०२९४.०८ चौ.मी. क्षेत्रावर मागील ७० वर्षापासून विविध जाती धर्मातील मोलमजुरी करणाऱ्या कामगारांची १३१ कुटुंबे अतिक्रमण करून घरे बांधून राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या निर्मितीपूर्वीच्या जलसंपदा विभागाच्या जागेवर अतिक्रमण असल्याने व गरिबांना इतरत्र जाणे शक्य नसल्याने अतिक्रमण केलेली शासकीय जागा जिल्हाधिकारी यांचेमार्फत संबंधित गरजू कुटूंबांना हस्तांतरीत करण्याबाबत आदेश व्हावेत अशा आशयाच्या मागणीचे पत्र तत्कालीन विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी मा.मुख्यमंत्री यांना त्यांचे पत्र क्र.विपने/वि.प/३१८/२००६ दिनांक १ जून, २००६ रोजी कळविले असताना, तत्कालीन जलसंपदा मंत्री तसेच विद्यमान उपमुख्यमंत्री यांनी त्यांचे पत्र क्र.संकीर्ण-२००६/२०७/२००६/सिं.व्य(म), दिनांक २४ जानेवारी, २००८ अन्वये सदर नागरिक ७० वर्षांपासून राहत असल्याने त्यांची निवासी घरे हटविणे मानवतेच्या दृष्टीने उचित होणार नसल्यामुळे अतिक्रमण जागेची मोजणी करून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या धोरणानुसार नियामक मंडळाच्या मान्यतेने जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सदर

जागा हस्तांतर करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत, असे लेखी स्वरूपात तत्कालीन विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेवरील अतिक्रमण हे सन १९५० पासून म्हणजे ७० वर्षापूर्वीचे असल्यामुळे सदर प्रकरणी शासनस्तरावरून पुढील योग्य ती कार्यवाही करणे उचित राहिल असे श्री.अ.द.व्यास, विशेष अधीक्षक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, पुणे यांचे स्वाक्षरीनिशी पत्र क्र.म.कृ.खो.वि.म/आ.३/(११२/०६)/९८८६, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ अन्वये सचिव, जलसंपदा विभाग यांना लेखी स्वरूपात कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माळेगाव कॉलनी (ता.बारामती, जि.पुणे) येथे घरे बांधून राहत असलेल्या गरिबांना शासनाच्या धोरणानुसार सदर जागा त्यांचे नावावर हस्तांतरित करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अतिक्रमण जागा संबंधितांचे नावे हस्तांतरित करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जागा अतिक्रमण केलेल्या संबंधित लोकांच्या नावावर हस्तांतरित करण्याचेदृष्टीने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (१८-११-२०२०) : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) सदरहू प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका प्रलंबित आहे, न्यायालयाच्या निकालानंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

खामगाव (जि.बुलढाणा) येथील आपत्तीग्रस्तांना मदत मिळण्याबाबत

(४४) ४७५६ (२४-०८-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) तालुक्यात अतिवृष्ठीमुळे झालेले पिकांचे नुकसान, अपघाती मृत्यू व पुरामुळे बेघर झालेल्यांना मदत मिळण्यास प्रचंड अडथळा निर्माण होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२० च्या पहिल्या आठवड्यामध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसगिक आपत्तीग्रस्तांना मदत देण्यासाठी निधीची मागणी अमरावती विभागातील सर्वच जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तामार्फत शासनाकडे करूनही प्रस्तावावर निर्णय न झाल्याने सदरहू प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैसगिक आपत्तीग्रस्तांना तात्काळ मदत देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (०२-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे नाहुर (ता.कुर्ला, जि.मुंबई उपनगर) येथील जमीन मिळकतीवर वारस नोंद घेण्याबाबत

(४५) ४७८१ (१४-०९-२०२०) श्री.जयंत पाटील : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नाहुर (ता.कुर्ला, जि.मुंबई उपनगर) येथील सर्व्हे क्र. १५/४, १५/५, १५/७ व १५/२ पैकी जमीन मिळकतीमध्ये कुळ खातेदार मथीबाई शंकर पाटील या दिनांक २०/०६/१९६७ रोजी मयत झाल्याने त्यांचे वारसदारांची नावे मिळकतीवर वारस नोंद लावण्याबाबत दिनांक १४/०८/२०२० रोजी तहसिलदार, कुर्ला यांचेकडे अर्ज केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अर्जाबाबत संबंधित मंडळाधिकारी व तलाठी फेरफार टाकण्यास गैरव्यवहाराच्या उद्देशाने टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वारस फेरफार नोंद करण्याच्या कामामध्ये दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करुन उपरोक्त जमीन मिळकतीवर मथीबाई शंकर पाटील यांचे वारस नोंद लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२८-१०-२०२०) : (१), (२), (३) व (४) मौजे-नाहूर, ता.कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर येथील स.क्र. १५/४, १५/५, १५/७ व १५/२ पैकी या मिळकतीवर इतर हक्कात वारस नोंद लावण्याकरीता अर्जदार श्री.अरुण रामा पाटील यांचे कुळमुखत्यारी श्री.नागेश किसनराव निमकर यांनी तहसिलदार कुर्ला यांचेकडे दिनांक १४/०८/२०२० रोजीचा अर्ज दाखल केला होता. तहसिलदार कुर्ला यांनी सदर अर्ज पुढील कार्यवाहीकरीता दिनांक २८/०८/२०२० रोजी तलाठी सजा-नाहूर यांचेकडे पाठविला.

उक्त नमूद मिळकतीचे गा.न.नं.७/१२ चे गाव अभिलेख पाहता, कब्जेदार सदरी "सॉल्ट डिपार्टमेंट" यांचे नाव दाखल आहे व इतर हक्क सदरी संरक्षित कुळ म्हणून मथीबाई शंकर यांचे नावाची नोंद आहे. फेरफार क्र. २५१ दिनांक १५/११/१९५० अन्वये कुळकायद्याच्या कलम २, ३ व ३ (अ) प्रमाणे संरक्षित कुळांची नांवे दाखल केल्याचे दिसून येते.

कुळ कायद्यातील तरतुदीनुसार दिनांक ०१/०४/१९५७ हा "कृषकदिन" ठरविण्यात आला आहे. या दिनांकास जर कुळाने कायदेशीर कुळ म्हणून जमीन धारण केली असेल तर त्या कुळाने ती जमीन सर्व बोजांपासून मुक्त अशी आपल्या जमीन मालकाकडून खरेदी केली आहे असे मानण्यात येईल. परंतु, महसूल विभाग, सचिवालय, बॉम्बे यांनी मुंबई कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ८८ (१) (बी) अन्वये अधिसूचना क्रमांक ५१५७/३११९०-एम, दिनांक २९/०३/१९५७ ही शासन राजपत्रात दिनांक ०४ एप्रिल, १९५७ रोजी प्रसिध्द केली आहे. त्यानुसार मौजे नाहूर ता.कुर्ला या गावाला कुळ कायद्याच्या कलम-१ ते ८७ तरतुदी लागू होत नाहीत. यास्तव,

सदर प्रकरणी कुळ कायद्यानुसार संरक्षित कुळास वारस नोंद करणे उचित होणार नाही, असे तलाठी नाहूर यांनी अर्जदारास दिनांक २५/०९/२०२० रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे.

तसेच, सदर मिळकत ही शासकीय (सॉल्ट डिपार्टमेंट) यांच्या नावे असल्यामुळे त्यावरील नमूद असलेल्या कुळांची वारस नोंद घेणे योग्य होणार नाही, असा अहवाल तहसिलदार, कुर्ला (मुलुंड) यांनी सादर केला आहे.

उमरेड (ता.उमरेड, जि.नागपूर) येथील व्यसनमुक्ती केंद्राच्या चौकशी करण्याबाबत

(४६) १०८६८ (१९-०४-२०१७) श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (ता.उमरेड, जि.नागपूर) येथे व्यसनमुक्ती केंद्र चालविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्राला सामाजिक न्याय विभागाने सन २०१२ ते २०१५ पर्यंत अनुदान मंजूर केले असून ते किती आहेत,

(३) असल्यास, सदरहू व्यसनमुक्ती केंद्र कागदोपत्री असल्याची बातमी लोकमत वृत्तपत्र नागपूर या दैनिकात दिनांक १० जून, २०१५ रोजी प्रसिध्द झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासन तात्काळ दखल घेऊन या व्यसनमुक्ती केंद्रासह राज्यातील इतर व्यसनमुक्ती केंद्रांची चौकशी करणार आहे काय ?

श्री.धनंजय मुंडे (०३-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सन २०१२ ते २०१५ पर्यंत एकूण २०,२०,६८०/- अनुदान मंजूर केले आहे.

(३) होय, तथापि, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर कार्यालयातील २ निरीक्षकांनी प्रत्यक्ष भेट देऊन खात्री केली असता सदरचे केंद्र सुरळीत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सन १०/०६/२०१५ च्या बातमीत तथ्य दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात डॉक्टरांवरील होत असलेले हल्ले थांबविण्याबाबत

(४७) १५७३० (२१-०४-२०१७) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी शासकीय व खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांवर रुग्णांच्या नातेवाईक व समाजकंटकाकडून जीवघेणे हल्ले होत असूनही डॉक्टरांना कोणतेही संरक्षण देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांवरील होत असलेले हल्ले त्वरित थांबविण्याबाबत तसेच त्यांना संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२६-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्य व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१० अंतर्गत वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या व्यक्तींच्या जिविताला इजा निर्माण करणाऱ्या आणि वैद्यकीय सेवा संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करणाऱ्या हिंसक कृत्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार अशा प्रकरणात पोलिसांकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.

तसेच शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक २३/०८/२०१३ अन्वये वैद्यकीय सेवा व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था यांची सुरक्षितता व रक्षा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सुरक्षा समिती नेमण्यात आली आहे.

(३) विलंब होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

औरंगाबाद महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून वोखार्ड व अजंता फार्म या कंपन्यांनी घेतलेला भुखंड अविकसित असल्याबाबत

(४८) ३००७७ (१४-०८-२०१२) श्री.विक्रम काळे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शेंद्रा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये वोखार्ड व अजंता फार्मा या कंपन्यांनी वर्षापूर्वी भुखंड घेतला परंतू तो अद्याप विकसित केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ यांनी कराराप्रमाणे अद्याप काहीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई (२६-११-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) लागू नाही.

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (एमफुक्टो) विविध मागण्यांबाबत

(४९) ४१७९० (२८-०८-२०१३) श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (एमफुक्टो) दिनांक २४ सप्टेंबर, २०१२ रोजी वा त्यादरम्यान त्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात राज्यव्यापी आंदोलने करण्याची सूचना मा.मुख्यमंत्री व मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यासोबत मा.सामाजिक न्याय मंत्री यांनीही दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीपत्र उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग दिनांक १२ ऑगस्ट, २००९ रोजीच्या शासन आदेशाने दिनांक १ जानेवारी, २००६ पासून लागू केल्यानंतर तब्बल २५ महिने विलंबाने सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना दिनांक २२ सप्टेंबर, २०११ रोजी शासन आदेश काढून दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करुन प्रत्यक्ष अंमलबजावणी माहे एप्रिल, २०१२ पासून करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) आंदोलनादरम्यान मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१२ च्या पत्रानुसार दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ ला दुपारी १२.३० वाजता आपल्या मंत्रालयीन दालनात एमफुक्टो प्रतिनिधी मंडळासोबत बैठक आयोजित केली होती व त्यावेळी एमफुक्टोने एका निवेदनाव्दारे समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना दिनांक १ एप्रिल, २०१० ते दिनांक २१ मार्च, २०१२ या कालखंडाची थकबाकी रोखीने द्यावयाच्या असून दिनांक ०१/०१/२००६ ते ३१/०३/२०१० या कालखंडाची थकबाकी प्रथम राज्य शासनाने अदा करावयाची आहे व नंतर त्याची प्रतिपूर्ती केंद्र शासन करणार असून तसे केंद्रीय मानव संसाधन विभागाने दिनांक १४/०८/२०१२ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे लक्षात आणून दिले व ही बाब आता केंद्राने पाठविलेल्या दिनांक १४/११/२०१२ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे लक्षात आणून दिले व ही बाब आता केंद्राने पाठविलेल्या दिनांक १४/११/२०१२ च्या पत्राने देखील स्पष्ट झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार थकबाकी अदा करण्यासंदर्भात सामाजिक न्याय विभागाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

श्री.धनंजय मुंडे (०१-१२-२०२०) : (१) होय.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय, दिनांक ०१/०४/२०१० ते २१/०३/२०१२ या कालखंडातील थकबाकी शिक्षकीय कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेली आहे. तसेच समाजकार्य महाविद्यालय शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना ६ वा वेतन

आयोगाचा दिनांक ०१/०१/२००६ व दिनांक ३१/०३/२०१० च्या कालावधीची थकबाकी रक्कम सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीव्दारे अदा करण्यात आली आहे.

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कर्मचाऱ्यांनी विनंती बदलीकरीता प्रस्ताव सादर केल्याबाबत

(५०) ४४०५१ (०५-१२-२०१८) श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत डॉक्टर, परिचारिका, लिपिक, सांख्यिकी असे ५ हजार कर्मचाऱ्यांनी विनंती बदलीकरीता प्रस्ताव सादर करूनही अद्याप विनंती बदल्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर विनंती बदल्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (१७-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड वेतन ५४००) संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीने शासनस्तरावरुन दिनांक ३१/०५/२०१८ व विनंती बदल्या दिनांक १०/१०/२०१८ च्या आदेशान्वये करण्यात आलेल्या आहेत.

आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिनस्त असलेले परिमंडळे यांचेस्तरावरुन अधिपरिचारीका व परिसेविका यांची आस्थापना हाताळण्यात येते. अधिपरिचारीका व परिसेविका गट-क यांच्या सर्वसाधारण बदल्या मे, २०१८ मध्ये परिमंडळे यांचेस्तरावरुन नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीने व शासन निर्णय, दिनांक ०९/०४/२०१८ अन्वये समुपदेशनाने संबंधितांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार करण्यात आलेल्या आहेत.

आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिनस्त असलेले परिमंडळे व कार्यक्रम प्रमुख, यांचे आस्थापनेवरील गट-क कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या मे, २०१८ मध्ये परिमंडळे व कार्यक्रम प्रमुख यांचेस्तरावरील नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीने व शासन निर्णय, दिनांक ०९/०४/२०१८ अन्वये समुपदेशनाने कर्मचाऱ्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार करण्यात आलेल्या आहेत.

(३) विलंब होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

श्री.राजेंद्र भागवत
सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.